# मधु-माधव

१६२४
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ३१८.

विठ्ठलराव घाटे
माधव जूलियन्

REFBK-0002844
REFBK-0002844

सं.काव्य ७८०

किरण

2844

# मधु-माधव

REFBK-0002844

विठ्ठलराव घाटे.
माधव जूलियन्.

[ रविकिरणमण्डळ ]

२० आक्टोबर १९२४.

# प्रस्तावना

—०—

बारा वर्षांपूर्वीची गोष्ट ! विद्यार्थी दशेंत असतांना बडोद्यास आह्मी एकमेकांच्या कविता मनोभावानें वाचल्या व पुढें मागें एकमेकांचा हात धरून वाङ्मय क्षेत्रांत बरोबर प्रवेश करण्याचा संकल्प केला. आज त्या संकल्पाची पूर्तता होत आहे. आज आह्मा उभयतास बडोद्याचें ते नव्या हुरुपाचे दिवस, काव्याचें परिशीलन, बडोद्याच्या त्या अज्ञात कविराजाचा सहवास-सर्व डोळ्यासमोर दिसत आहे. आज या लहानग्या पुस्तकाच्या रूपानें आह्मी आपली काव्यमैत्री महाराष्ट्र-वाङ्मयांत नमूद करीत आहोंत.

आमच्या हातून मोठी श्रेष्ठ दर्जाची स्वतन्त्र काव्यनिष्पत्ति झाली आहे असें आह्मांस वाटत नाहीं. तथापि आम्ही सांप्रदायिकहि नाहीं. साहजिक स्फूर्तीनें आमच्या मगदूराप्रमाणें जी काव्यरचना आमच्याकडून झाली ती येथें रसिकांस सादर केली आहे. आमची खात्री आहे कीं ज्या भावना या काव्यरचनेस कारण झाल्या त्या रसिकांच्या मनांतहि वास करीत असतील. अर्थात् त्यांना पुढील काव्यां-विषयीं आपलेपणाचा जिव्हाळा वाटणें साहजिक आहे; त्याला आमची शिफारस नको.

फॉर्जेट टरेस }
मुम्बई. }

विठ्ठलराव घाटे.
माधव जूलियन्.

———

सं. का. ५ ८ ७०
न.

# विठ्ठलराव घाटे.

# रविकिरण मंडळ.

माधव त्रिम्बक पटवर्धन, एम्. ए.

विठ्ठल दत्तात्रय घाटे, एम्. ए.

श्रीधर बाळकृष्ण रानडे, बी. ए. एम्. एस्

सौ. मनोरमा रानडे, बी. ए.

गजानन त्र्यंबक माडखोलकर.

यशवंत दिनकर पेंढरकर.

शंकर केशव कानेटकर, बी. ए.

दत्तात्रय लक्ष्मण गोखले बी. ए.

---

प्रकाशक–यशवंत दिनकर पेंढरकर ४६१ शनवार पुणें.
मुद्रक–भास्कर रघुनाथ कद्रेकर, रवींद्र प्रिंटींग वर्क्स, गिरगांव–मुंबई ४.

# मधु-माधव

2688

## आई—!

—:*:—

( चालः–तीरथ कोन फिरे० )

नव लाख दिवे हे तुझ्या घरीं
कां जातिस दुसऱ्यांच्या दारीं ॥ धृव० ॥

हा अनंत पसरला नीलिमा,
शांत गभीर जयाची सुषमा,
विभूति ही प्रभुची निःसीमा
नांदतसे तव शिरावरी ॥ कां जातिस० १

धवल हिमाचल वर विस्तरला
अनंतामधें विलीन झाला
उदात्तरस शीकवी कवींला
बुद्धिस्थलिं तव वास करी ॥ कां जातिस० २

सामघोषमुखरित वनराई,
मधुनी जाई गंगामाई,
कलस्वनें तीं गीतें गाई
तव हृदयावरि निरंतरी ॥ कां जातिस० ३

अनंत दुःखें हृदयीं धरिलीं,
अनंत गूढें मनीं वाहिलीं,
अनंत कन्यारत्नें असलीं
प्रसवलीस तूं धन्य खरी ! ॥ कां जातिस० ४
किति कविंनीं किति काव्या गावें !
किती तुझें वैभव वर्णावें !
किती तुझे जयघोष करावे !
वंदे त्वां मांगलेश्वरी ! ॥ कां जातिस० ५

विजापूर, आगष्ट १९२१

---

# स्मशानगीत

( सुनीत—साकीवृत्त )

या काळाच्या संतानांनो ! आला आला घाला !
सोडा रडणें, पदर पसरणें, माना खालीं घाला !
नियामकांना नका भरंवसूं हे तर फसवे चोर,
उघडा डोळे पहा नीट हें जळतें काय समोर !
जिवंत आम्ही जळतों हृदयीं, हीं मेलेलीं सरणीं !
जगा मरा, परि चुके न केव्हां यदृच्छेची करणी.
तिकडे देतां डाग यांजला, बसती इकडे डाग,
आग लावितां तिकडे यांना, लागे इकडे आग.

आला, जुळला सवदा, गेला; नफा कशाचा झाला ?
राखेमध्यें राख मिळाली; कोठें गेल्या ज्वाला ?
ज्वाला कसच्या ? स्वर्ग कशाचा ? ही तर सारी राख !
अमुचें वैभव, अमुच्या आशा होती येथें खाक !
–तों सूं सूं सूं शब्द निघाले, प्रेता आधण आलें !
वाफ उडाली; कृतज्ञतेनें मी वर डोळे केले !

इंदूर, १९१२

## प्रेमानें ध्याऊं

( चालः–रमवाया जावूं )

प्रेमानें ध्याऊं प्रभुजी ! प्रेमानें ध्याऊं ॥ ध्रुव० ॥

आधी येवो, व्याधी येवो,
मन जन-तापें तप्तहि होवो,
कोठें जावो, कोठें नेवो,
संतत तुज सेवूं प्रभुजी ! प्रेमानें ध्याऊं १

तेज असो वा, तिमिर असो वा,
उषा असो संध्याहि असो वा,
कांहिं असो वा, कांहिं नसो वा,
शून्यीं तुज पाहूं प्रभुजी ! प्रेमानें ध्याऊं २

मनस्ताप दे संतापाला,
दोषहि देऊं तेव्हां तुजला,
परि दुज्या क्षणीं तव चरणाला,
अनुतापें धावूं प्रभुजी ! प्रेमानें ध्याऊं ३

तरल घनांच्या सुखलास्यांत,
मधुर फुलांच्या वा हास्यांत,
शांत जलांच्या वर्षावांत,
छबी तुझी पाहूं प्रभुजी ! प्रेमानें ध्याऊं ४

मागें पुढती स्थिती कोणती ?
कशास काथ्या–कूट अम्हां ती ?
नहि भक्तांची, शास्त्र्यांचीं ती.
आम्ही तुज गाऊं प्रभुजी ! प्रेमानें ध्याऊं ५

तर्कवितर्का सोडुनि देऊं,
एकभाव निश्चल मनिं ठेवूं,
जिवंत भक्तीमध्यें पोहूं,
संतत तुज बाहूं प्रभुजी ! प्रेमानें ध्याऊं ६

सृष्टीचे पडदे सारूं दे,
गूढ सुखें आम्हां भोगूं दे,
दाहिदिशां प्रेमा खेळूं दे,
भक्ता दे गाऊं प्रभुजी ! प्रेमानें ध्याऊं. ७

इंदूर १९१३

# माझा अभिसार

( वृत्तः-पंचकल्याणी )

ऋतु वसंताची स्वारी आली, फुललें बाई मी फुलवेली,
सजणाविण दुनिया सुनी परी वाटली. १

साडी अस्मानी मी ल्यालें, नाना साजें मज सजवीलें,
मी नटलें थटलें अभिसारिकाच बनलें. २

सजण मम कोण कसा तो होई, कोठें दिसेल ठाउक नाहीं,
परि मी भेटाया तया निघालें बाई ! ३

चाललें बाई मी तांतडी, पालथी केली देशोधडी,
गवसेना कांहींकेल्या माझा गडी. ४

हुडकिलें किति मीं रानीं वनीं, पुशिलें पाखरांस साजणी,
कुणि सांगेना तो कोठें माझा धनी. ५

कुंथत होता ओढा कुणी, साथ मीं त्यास दिली असवांनीं,
वैऱ्याची गेली रात्र मला ऐरानीं. ६

तांबडें फुटलें तों त्यावेळीं, झुळ झुळ झुळुक वायुची आली,
लगभगी बिलगली हळूच माझ्या गालीं. ७

सखे साजणी ! कथूं ग काई, रडत होतें मी धाई धाई,
तों कुणिं साद घातली मिठी मारिली बाई. ८

दचकलें झालें मी बावरी, म्हटलें ‘ हो सैताना दुरी ! ’
म्हणें तें ‘ मग कां तूं सैतानाची नोवरी ? ’ ९

मान मीं वळवीली अभिमानें, फेंकिली जहर नजर रागानें,
तों शुद्ध बुद्ध हरपली जणूं जादूनें. १०

झोत झंझ्याचा जैसा आला, झुकाविलें नाजुकशा केळीला,
मी झुकलें तैशी कोणाच्या पायाला. ११

आलें क्षणांत शुद्धीवरी, पाहिलें उघडुनि डोळे वरी,
तों उचलुनि जवळी उभी करी मज स्वारी. १२

ओठ ओठास येउनी जुळला, देह देहास येउनी मिळला,
भासली धुगधुगी नाड्यांची उभयाला. १३

झालें इतुकी त्यांच्या जवळी, कीं ती मूर्ती अंधुक दिसली,
परि धुक्यांतुनी नेत्रिंच्या ध अद्भुत गमली. १४

बोलले हळूच कांहीं कांहीं, मीं तें आयकिलेंही नाहीं,
परि गुपित त्यांतलें मला समजलें बाई ! १५

झालें गडे कसेसें मजला, लाजलें लवलें मी किति वेळां,
उसळलें रक्त तनु रसरसली वेल्हाळा. १६

वळसा बाहूंचा घातला, जिवाचा राजा बंदी केला,
शोभलें लता गुरफटे जशी वृक्षाला. १७

बोललें, “ नाथा ! रडलें कुढलें, अंतीं पायावर या पडलें,
अंतर नच द्यावें प्रिया ! शरण मी आलें. १८

आपण कोण कोठचे राजे, करितां राज्य कसें मुलखाचें,
मज काय तयाचें आपण राजे माझे !" १९

प्रियकर किंचित सस्मित हंसले, स्मित तें माझ्या हृदयीं ठसलें,
मी नटलें थटलें अभिसारिकाच बनलें. २०

इंदूर, डोलग्यारस १९१३

---

## मानवी अरसिकता

आकाशांतुन पाझरे रस पहा हा प्रीतिचा सोज्वल,
ओढे, पक्षि, तरू, लता हंसुनिया बेहोष झालीं पुरीं.
पुष्पांनीं निज सौरभें वितरलें चैतन्य भूमीवरी,
भूमीही जड ती, परी मधुरशा गंधास उच्छ्वासिली.
सृष्टीच्या सहलींत दंग सगळे पक्षी-पशू जाहले,
आह्मां काय परी ! अह्मी रडतसूं दारें अहा ! लावुनी.
एक्या मर्त्यदिनास्तव क्षितिवरीं आलीं फुलें हीं इथें,
हांसोनी, हंसवोनिही मज, लया जातील आतां पहा !
आह्मी श्रेष्ठ स्वतः सदा गणितसूं-श्रेष्ठत्व तें कोणतें ?
ज्यानें हें दिधलें तया हिणविणें मोठेपणा आमुचा !

झाल्या बोथट सर्व वृत्ति अमुच्या ! ये विश्व खाया अह्मा !
सृष्टी भेसुर, चेतनारहित–धिक् आह्मी स्वतः भेसुर !
ईशा ! आयु नको बहू, रसिकता दे पुष्पजातींतली,
जेणें बागडुनी इथें क्षणभरीं येऊं तुझ्यासन्निध !

इंदूर ९ मे १९१३

---

## मज ओलावा हवा

मज ओलावा हवा । सुकलेल्या या जिवा ॥ धृव० ॥
जीव बोलतो पाणी पाणी
बघे चहुंकडे बापुडवाणी
परि तें कोणी मनीं न आणी.
या, पाणी पाजवा । तान्हेल्या या जिवा १
बघूं नका वरच्या सोंगाला,
आंत बघा वणवाच भडकला,
कुणी तरी या, विझवा याला,
प्रेमाश्रू मज हवा । या जळल्या मम जिवा २
जो तो अपुल्या भोंती फिरतो,
जो तो अपुल्यालाच कवळतो,
दाद कोण गरिबाची घेतो,
कोण पुसे केधवा । दुखलेल्या या जिवा ३

माझा माझा म्हणतां सारे
मी येतां मग पळतां कां रें ?
ही प्रीतीची रीति नच बरें,
प्रीति खरी दाखवा । या प्रेमी मम जिवा. ४

निभावेल वाटलें मनाला,
जीव कुढत कोंपऱ्यांत बसला,
आज परी कासाविस झाला,
कोणि तरी वाचवा । या बुडत्या मम जिवा. ५

रुक्ष आज दुनिया झाली ही
तीमधिं माझी नाजुक जाई
प्रेमाविण करपते पहा ही,
प्रेमजला सिंचवा । फुलवा या मम जिवा. ६

कुणातरी हृदया बिलगावें,
भ्याड मुलापरि झोंपीं जावें,
स्वप्न गोड मग बघत रहावें
आस असे ही जिवा । कोणि तरी तोषवा. ७

कुणातरी आसऱ्यास जावें,
हृदय मोकळें सर्व करावें,
मनमुराद मग रडुनी घ्यावें,
आस असे ही जिवा । कोणि तरी तोषवा. ८

या, उतरा, मेघराज माझे !
चाखूं द्या रस ताजे ताजे
तप्त मना करितील गार जे,
प्रेमरवा ऐकवा । या मोरा नाचवा. ९

पुणें जून १९१६

---

## माझ्या फुला !

( चालः–भज नरा० )

माझ्या फुला ! उमल गडे ! उमल जरा ॥ ध्रुव० ॥
लुकलुकव तव नयन गोजिरे, डुलव डुलव हा भृंग जरा १
अश्रूंचें दंव झिरपवितों, तव एक एक कळि उघड जरा २
फेंक बघूं सौरभ दुनियेवर, झुके कशी ती पाहुं जरा ३
उषा प्रीतिची ही बघ फुलली, रहस्य आंतिल फुलव जरा. ४

इंदूर. ८ फेब्रुवारी १९१८

---

## एक लावणी

" Meet if thou require it,
Both demands;
Laying flesh and spirit
In thy hands !"—Browning.

**चालः**–प्राणसख्या जिवलगा फुलाचा झेला

ने सख्या कुठेंही अफाट दुनियेवर,
येइन बघ मागें नाचत मी लांडोर ॥ तूं मोर ॥ ध्रुव० ॥

घाटे
काव्य ७८०

टाकला पिउन एकदां विषाचा प्याला
प्रीतिचा, तुझ्या हातचा, मीपणा मेला ॥ त्वन्मय झाला.

तव बोल बोलतें, चाल चालतें राया !
तार वा मार, हा देह जीव तव पाया ॥ रे सखया !

आंधळा दांडगा बाई ! मम विश्वास !
चढविलें तुला वर, देवच तूं मम खास ॥ या समयास

दे जरा बघूं आसरा तुझ्या हाताचा
मग वळुनी हसुनी पाहिन मुखडा साचा ॥ विश्वाचा

हो तरी पुढें, चल अफाट दुनियेवर
येइन बघ मागें नाचत मी लांडोर ॥ तूं मोर !

वडनगर, ६ जून १९१८

---

## श्रीशिवराजस्तोत्र.

( ही धार्मिक स्वरूपाची कविता आहे. हिच्यांत राजकारण नाहीं. शिवरायाच्या पायाशीं एका प्रातःकाळीं बसून झटलेलें हें स्तोत्र आहे. )

दुही माजली, दैन्य आलें कपाळा,
मराठा मनीं लोभला मन्सबीला,
तदां जागवी जो महाराष्ट्र सारा,
नमस्कार माझा तया बालवीरा. १

जिला पाहतां अप्सरेनें लवावें,
तिला पाहतां जो वदे शुद्धभावें,
जरी लाभतें रूप हें माउलीला,
तरी प्राप्त होतें अहा ! तें अम्हाला. २

जयें यावनी धर्म स्वीकारियेला,
तया हिंदु केलें, दिले आत्मजेला,
न केव्हां दिला अंधरूढीस थारा,
नमस्कार माझा तया कर्मवीरा. ३

असे विप्र हा, शूद्र हा, हा अवंध,
असा ठेविला भेद ज्यानें न निंद्य;
समत्वें तयां योजिलें राष्ट्रकाजा,
नमस्कार त्या श्रीशिवाजीस माझा. ४

तपोभूमिका पाहुनी तेथ ठेला,
डुलूं लागला, अंतरीं तृप्त झाला;
उपाधी-शतांची स्मृतीही न ज्याला
नमस्कार त्या राजयोगीश्वराला. ५

जरी योजिलें कार्यभागीं जनांला,
पुढें सिंहसा धावला सर्व वेळां,
उभा ठाकला जो स्वयें झुंजण्याला,
नमस्कार त्या श्रेष्ठ लोकाग्रणीला. ६

[library stamp]

यशाची जिवाची न पर्वा कशाची,
सदा साधली एक सेवा जियेची
गुरूच्या पदीं वाहि त्या दौलतीला,
नमस्कार त्या राजसंन्यासियाला. ७

नमावें तयांला, स्मरावें तयांला,
सदा आळवावें, भजावें तयांला,
म्हणावें, "महाराज ! या एक वेळां,
पुन्हा आर्यभू बोलवी आपणांला !" ८

ग्वाल्हेर, मे १९१९

---

## शिवरायाचा जयजयकार !

(चालः-तूं टाक चिरुनि ही मान.)

उगवला सुदिन अजि फार, करा साचार
महाराष्ट्राच्या कालिजाचा शिवरायाचा जयजयकार ॥ धृव० ॥

आठवा तयाचें रूप,
आठवा तसाच प्रताप,
आठवा तसा साक्षेप,
मग ह्मणा महात्मा ऐसा कधिं कां पुनरपि अवतरणार ! १

स्फूर्तिमान् पुढारी असले,
कां बनलां मग मागसले,
हें अशुभ विशेषण कसलें,
का मर्द मराठा हात कपाळावर ठेवुनि बसणार ? २
तो सिंहनाद ऐकारे !
द्वेषभाव विसरुनि जारे !
ऐक्यानें पुढति सरारे !
मग रायगडीच्या समाधिलाही समाधान होणार ! ३

ग्वाल्हेर २ एप्रील १९२१

---

## ताई ह्मणूं का तुला ?

कांपे जीभ ह्मणावया, तरि गडे ! ताई ह्मणूं का तुला ?
नेत्रीं अश्रु उभे, निषेध करिती--ताई ह्मणूं का तुला ?
बुद्धी ही थिजली, विचार न सुचे--ताई ह्मणूं का तुला ?
होते दग्ध पुन्हा जरी ह्रदय हें--ताई ह्मणूं का तुला ?
लीलेनें मृदु हांसुनी नजर ही, तूं फेंकिली जादुची;
झाला खेळ तुझा, परी जखम ही केलीस आखेरची !
तेव्हांपासुनि आवरीत बसलों हा रक्तवाही झरा !
लैला तूं मम हो न हो, परि तुझा मज्नून झालों पुरा.

ग्वाल्हेर, मे १९२१

---

# आई आह्मां आठवशिल ना ?

---:०:---

( चालः-तीरथ कोन फिरे हमारा. )

[ आज भावी अभ्युदयाची आशा व खात्री वाटत आहे. राजा राममोहन राय, दादाभाई, रानडे या महात्म्यांना निराशेंत क्षुद्र स्वरुपाचीं कार्यें करण्यांत आयुष्य वेचावें लागलें ! त्यांच्या आत्म्यांस आज काय वाटत असेल ? ]

आई ! आह्मां आठवशिल ना
स्वातंत्र्याच्या हिमालयावरि पुन्हां समाधी घेतानां ॥ धृव० ॥

अंधारामधि खडा पहारा,
देत वेंचिला जन्महि सारा,
परि शुक्राचा प्रकाश अपुरा,
तोहि न दिसला नयनांना. १

जीर्ण चिरगुटें यत्नें अणिलीं,
आई ! लज्जा तुझी झांकिली,
हाय ! परी तीं अपुरीं झालीं
ढाळियलें मग अश्रूंना. २

स्वजनांचे उपहास साहिले,
परक्यांचेही क्लेश भोगिले,
परि जीवनरस सदा वाहिले,
माते ! तव मंगल स्नाना. ३

बालपणांतिल तरल कल्पना,
तारुण्यांतिल प्रेम-वासना,
वार्धक्यांतिल धर्म-भावना
समरस झाल्या तव चरणां. ४

घडल्या असतिल चुका घडोत,
देह तुझ्या कारणीं पडोत,
प्राण तुझ्या पूजनीं रमोत
जगतांना वा मरतांना ! ५

आगगाडींत मंदोसरजवळ जून १९२१

---

## तो पहा महात्मा आला !

( आसामांतील चहाच्या मळ्यांतील एक करुण कहाणी ! महात्माजींचें नांव ऐकून जीं कुली स्त्रीपुरुषें आपलें काम टाकून भयंकर जंगलांतून मार्ग काढून चांदपुरास येऊन पोंचलीं, त्यांच्यांत खालील गीत गाणाऱ्या अनाथ लेकुरवाळ्या बाईचा समावेश केला आहे. )

रडुं नको राजसा बाळा ! तो पहा महात्मा आला ॥ धृव० ॥

शशि मंगल शुक्र नभांत या प्रभाततेजीं विरले,
बघ बाळा ! देवाजीनें वर डोकें अपुलें केलें;
गोजिऱ्या पांखरांनीं या हें जंगल मंगल झालें,
मोकळ्या हवेनें बघ हे ताडवृक्ष कैसे डुलले.

संपली रात्र घोराची
अर्धपोटि राबायाची
कोपऱ्यांत मग कुढण्याची
हा ताजा वारा सुटला, तो पहा महात्मा आला. १

कां उगा बिलगसी राजा ! स्तनिं दूध कुठोनी यावें ?
चार दिवस झाले पुरते भाकरिचें नांव न ठावें,
चीत्कार मत्त हत्तींचे कानावर यावे जावे,
चाललों परी नेटानें कीं गांधीजींस पहावें.
घेउनी नांव गांधींचें,
सेविले कंद रानींचें,
प्यालों पाणी ओढ्यांचें,
आसाम पालथा केला, तो पहा महात्मा आला. २

बघ ताडांआड दिसाया लागला धूर लांबोनी,
असतील जोजवित बाया तान्हुल्यांस गाउनि गाणीं,
असतील वाढल्या पोरी सहज रानवेलीवाणी,
असतील फिरत ऐटीनें ते पुरुष ताठ मानांनीं.
मोकळ्या मनानें हंसत,
निर्घोरपणानें निजत
असतील काळ घालवित,
चाबूक तिथें तो कुठला ! तो पहा महात्मा आला. ३

हाय काय सांगूं बाळा ! घर अपुल्यालाही होतें,
स्वारींच्या छत्राखालीं नच जुमानिलें कोणातें,
बाळीनें मधुवाणीनें सुखविलें अह्मां उभयांतें,
प्रेमाचें वैभव आलें गरिबीच्या संसारातें.

तो दलाल आला मेला,
घरधन्यास घेउनि गेला,
अनुसरलों आह्मी त्याला,

जुंपलों गुलामगिरीला तो पहा महात्मा आला. ४

तो मळा चहाचा कसला तो नरक याच लोकींचा,
देतात गरिब गरिबीच्या जाब जेथ बा ! पापाचा,
काळा वा गोरा असला भेदभाव तेथें कसचा,
धनलोभें आत्मा काळा बाळा ! झाला दोघांचा.

धनिकांनीं सुख भोगावें,
गरिबांनीं कष्टी व्हावें,
हें कसें बरें चालावें,

तो काळ बदलला गेला हा पहा महात्मा आला. ५

वाढली पणामाधिं आली त्या तशा ठिकाणीं बाळी
तो–नांव कशाला त्याचें– दुष्टाची दृष्टी गेली,
हुंगली कळी जाईची कुस्करली फेकुनि दिधली,
दारांत मध्यरात्रीला बेभान अर्धमेलेली !

वाकल्या व्यथित नजरेनें,
पाहुनी अह्मां प्रेमानें,
सोडिले प्राण सोनीनें !
संदेश वरुनि पाठविला “ तो पहा महात्मा आला.” ६

खवळला त्वेष स्वारींचा पिंजऱ्यांतल्या वाघाचा,
धांवले घोट घ्यायाला त्या मांगाच्या नरडीचा,
पकडिलें, हाल किति केले— कांपते वदाया वाचा.
लढला परि पडला ऐसा धनि माझ्या सौभाग्यांचा !
“ कुणि देव कुठें जर दिसला,
आणितों शुद्धिवर त्याला,
ह्मणतों बघ या न्यायाला ! ”
हें ह्मणतां जीव निघाला तो पहा महात्मा आला. ७

मूढांनों ! होते सारे ते धर्मराज आतांचे !
सांडलेत चाबूकानें रक्त भूमिवरती त्यांचे !
आत्मघातक्यांनों ! होते ते अंशच परमेशाचे
शत नव्हे हजारों झाले अपराध किती शतकांचे !
देवाला जखमा झाल्या,
देवाला मूर्च्छा आल्या,
देवाच्या अब्रू गेल्या,
मग उघडि देव डोळ्यांला तो पहा महात्मा आला. ८

गरिबांची मूक तपस्या वाढली, नभाला भिडली,
जुलुमाचें आसन हललें, इंद्राची मांडी चळली,
गरिबांचीं उष्टीं बोरें देवाला ज्या प्रिय झालीं,
तो करुणासागर द्रवला ही यज्ञमूर्ति अवतरली !

डामडौल नाहीं बा रे !
खादीचे कपडे सारे
नच वहाणही पायीं रे !

गरिबांचा राजा असला तो पहा महात्मा आला. ९

' तो पहा महात्मा आला ' आयकिला, ध्वनि कानांनीं,
फेंकिलीं फावडीं खोरीं खोदितां भुई बाप्यांनीं,
टाकिल्या भाकरी तैशा अर्धभाजल्या बायांनीं,
स्तन सोडुनि वर उडवीले चिमुकले पाय बाळांनीं,

भेटले एकमेकांला,
अश्रुंचा सडा मग झाला,
चालले तीर्थयात्रेला

जयघोष एकची उठला ' तो पहा महात्मा आला ' ! १०

त्या कृश खांद्यावर भार तेतीस कोटि दुःखांचा !
त्या निश्चय-निष्ठुर नेत्रीं घोर आपुल्या अन्नाचा !
मानेवर डोंगर थोर हिंदूंच्या गतपापांचा !
हासरा परी तो अधर हासवी द्वेष वैऱ्यांचा !

त्या विशाल हृदयापाशीं,
आसरा गांजलेल्यांशीं
झुलु, महार वा मांगाशी
त्या आसऱ्यास चल बाळा    तो पहा महात्मा आला. ११

' तो पहा महात्मा आला '    कथुं काय याहुनी बाळा !
ते गेले आत्मा गेला    तेव्हांच स्वर्ग लोकाला,
हा देह राहिला तुजला    द्यावया महात्माजीला,
हो शूर शिपाई राजा !    गांधींच्या सैन्यामधला,
हा जीवाचा मम ठेवा,
तुज अर्पण गांधीदेवा !
घ्या याच्याकरवीं सेवा,
उद्धरा अह्मां गरिबांला    तो पहा महात्मा आला. १२

ग्वाल्हेर डिसेंबर १९२१

---

# दावा हिंदीजन मजला !

( चालः—राम भजन कर लेना० )

दावा हिंदीजन मजला । घेइन पाय धुळीला ॥ धृव० ॥

हा ब्राह्मण ह्मणवितो स्वतःला सोवळ्यामधें दडला,
तो तिकडें बापुडा तडफडे, महार ह्मणती त्याला. १



दा. क्र. 2088

शिवदेवाचा शूर मराठा देशासाठीं लढला,
नांवासाठीं आतां रुसला, नांव घेउनी बसला २
हा आला नेमस्त, टाकितो हळू हळू पायाला,
तो धांवे ओरडे पलिकडे, ह्मणा जहाल अह्मांला ३
आर्य सनातन हा थांबवितो येणाऱ्या कालाला,
नव्या जगाचा नवा सुधारक—भूतकाल नच त्याला ४
द्रविड, हूण, शक आले, केलें दार खुलें सर्वांला,
राष्ट्राचा चौफेर बांधिला कोट त्याच देशाला ! ५
नांवांच्या या अनंत मूर्ती, स्तोत्रपाठ सुरु झाला !
एकमेव अद्वितीय माता दिसली का कोणाला ? ६

ग्वाल्हेर २७ जानेवारी १९२२

---

## "आलात ते कशाला"

आलात ते कशाला,
प्रिय जाहला कशाला हो !
केली न पूसपास,
शिरलात राजरोस हो !
वदला न बोल कांहीं,
पुशिला हवाल नाहीं हो !

केलात मूक हल्ला,
बळकाविलात किल्ला हो !
ती नजर बाइ न्यारी,
भिडली कशी जिव्हारीं हो !
जें गूढ खोल खोल,
तें हेळिलें समूळ हो !
ही कोण बाइ घाई,
कांहींहि धीर नाहीं हो !
नाहीं विचार केला,
पुशिलें न मैत्रिणीला हो !
कां हें जिवास भावें
नाहीं अझून ठावें हो !
अनमोल प्रेमलेणें,
तें कां क्षणांत देणें हो !

* * *

जातां आतां कशाला,
आलात मग कशाला ? हो !
ही जाळपोळ करुनी ।
जातां कसें पळोनी हो !
ही काय मोगलाई ?
जिरणार चोरि नाहीं ! हो !

टाका इथेंच माल,

मग जा कुठें खुशाल हो !

हृदयांतल्या हिऱ्याला

जा ठेवुनी हवाला हो !

कां लागलात जाया ?

केला विनोद राया ! हो !

मीतूंपणा निमाला !

रागावतां कुणाला ? हो !

ग्वाल्हेर मार्च १९२२

---

# गा यशवंता ! आनंदानें !

( चालः-तुम जागो मोहन प्यारे )

गा यशवंता ! आनंदानें,

गाच गड्या ! रंगेल सुरेलें सुंदरसें कांहीं गाणें ॥ धृव० ॥

उद्यां सकाळीं आहे जाणें,

जीवन-कलहीं पुन्हां झगडणें,

आज कशाला परि त्या बुजणें;

चल रात्र जागवूं मौजेनें. १

आज मना वाटे लोळावें,
गोड तुझें गाणें ऐकावें,
काल उद्याला विसरुनि जावें,
    क्षण धुंद बनावें नादानें. २

आज नशा चढला जल्शाचा,
जीव भुका झाला गाण्याचा,
वाद नको जगण्या मरण्याचा,
    तें उद्यां, आज गा खुल्या मनें. ३

हा दरिया दुनियादारीचा,
रुक्ष आणि कटु कर्तव्याचा,
तूं मी काढूं ठाव तयाचा,
    रंगु दे आज रसरंगानें. ४

गळा खुला कर माझ्या लाला!
तो बघ दक्षिणतारा कलला,
छेड जरा उत्तर रागाला,
    टक लाउनि बसलीं बघ रानें. ५

आज मला बेहोष होउं दे,
पूर्वी हंसलों तसें हसूं दे,
विनोदवार्ता पुन्हां करूं दे,
    तें नको सदाचें आज जिणें ! ६

धुंद तुझ्या गाण्यानें होऊं,
धुंदींत उद्यां निरोप घेऊं,
धुंदींतच जगताला पाहूं,
मग धुंदींतच जगणें मरणें ! ७

ग्वाल्हेर ५ एप्रील १९२२

---

'यशवंत' म्हणजे माझे प्रिय मित्र श्री. यशवंत खंडेराव कुळकर्णी हे होत.

# तीन सुनीतें.

१

देवी ! कां शिरतेस मंदिरिं अशी नाहीं जरी राहणें,
नेत्रीं त्या न दयार्द्रता, मग बरें कां हें असें पाहणें ?
केव्हांचीच उभारली भगवती ! वेदी तुझ्याकारणें,
हें तों सत्य, परी असें क्षणभरीं नाहीं बरें थांबणें.
होतो नास्तिक घालवीत दिन मी वायूसवें खेळत,
होतो मानितही कृतार्थ मजला कीं मी स्वयंकेंद्रित;

होती सात्त्विकता परंतु नव्हते हे भाव हेलावलें,
प्रीतीला निरपेक्ष यज्ञ करणें होते न मीं जाणिलें.
तों माझ्या क्षितिजावरी चमकली देवी ! तुझी चांदणी,
सारा नूर नभांतला बदलला, झाला नवा तत्क्षणीं.
सारें उज्वल आणि सुंदर मला तेव्हां दिसों लागलें,
विश्वाचें नटवें स्वरूप नव्हतें केव्हां असें पाहिलें.
साधेंची परि आज वाटत बरें तें विश्व माझें जुनें,
जादू ही फसवी नको, हृदयही होणें नको खेळणें.

इंदूर नोव्हेंबर १९१७

---

२

होते आग इथें, पुन्हा भगवती ! त्या आठवीतां दिसा,
जेव्हां हांसत हांसत प्रगटली मूर्ती तुझी राजसा.
होती वीटहि द्यावया न, कुठलीं अर्घ्यास पुष्पें फलें,
यावें स्तोत्र कसें मुखांत सहसा, जें म्यां न अभ्यासिलें !
केला यत्न तुला जरा अळविण्या, भांबावलों थांबलों,
केला यत्न निहाळण्या तुज पुन्हा, तों लाजलों वांकलों.



मराठी ... ठाणे

आवेगें परि शेवटीं तुज मनोभावें नमस्कारिलें.
जें कोणास कुठें कधीं न दिधलें, तें आदरें अर्पिलें !
कां तेव्हां हंसलीस कां उठविलें त्वां तांतडीनें मला ?
कां प्रेमें वदलीस, कां मग उगा तेव्हां दिलासा दिला ?
आला जोम नवा, उमेद धरिली होईन मोठा कवी,
देशा वैभव आणितील असलीं गाईन गाणीं नवीं !
झालें स्वप्नच हाय तें, निघुनि तूं गेलीस मायाविनी !
गाणीं तीं कसचीं अतां, निपजतीं हीं शोकगीतें मनीं.

बुरली १०–६–२४

---

## ३

कां माझ्या भवितव्यते ! मग अजी येणें असें योजिलें ?
हेतू काय मनीं अजूनहि कळूं दे एकदां ते भले.
कुंडाभोंति असें कशास फिरणें ? नाहीं हवी कां पुरा ?
कां प्राणाहुति वाचुनी तळमळे आत्मा तुझा घाबरा. १

छेः हें काय ? कशीं वदू कटु वचें, देवीस माझ्या वृथा,
नाहीं पात्र जरी प्रसाद करण्या कां आस ही अन्यथा !

माझें मान्य मला भविष्य, बघ मी ही मान खालीं करीं,
माझ्या आयुवरी खुशाल अपुलें स्वामित्व देवी करी. २

स्वामित्वास करी, परी दुरुनची, ह्या सूर्य जेवीं नभीं
तूझें तेज असह्य, दृष्टि जळते, त्याला करूं काय मी!
मी आहेच तुझा, तुझींच हृदयीं मूर्ति प्रतिष्ठापिली
आतां एकच मागणें, फिरव ही दृष्टी परी आपुली. ३

जा देवी ! परतोनि जा, तुजहुनी मूर्ती तुझी ही बरी
ही नाहीं फसवीत, जा, परत जा, पूजा हिची मी करीं !

शाजापूर आक्टोबर १९१८

---

## रुग्ण शय्येवर—

चाल—मै जल भरवाने जमुनाजीपे.

वंदु किती प्रीतिची बाळा ! तव नवलाई,
रडविशी न रडत्या ताता ठायीं ठायीं. १
तूं मला मी तुला, आपण या रानांत
चाललों वाट कष्टानें अंधारांत. २

आवेगें परि शेवटीं तुज मनोभावें नमस्कारिलें.
जें कोणास कुठें कधीं न दिधलें, तें आदरें अर्पिलें !
कां तेव्हां हंसलीस कां उठविलें त्वां तांतडीनें मला ?
कां प्रेमें वदलीस, कां मग उगा तेव्हां दिलासा दिला ?
आला जोम नवा, उमेद धरिली होईन मोठा कवी,
देशा वैभव आणितील असलीं गाईन गाणीं नवीं !
झालें स्वप्नच हाय तें, निघुनि तूं गेलीस मायाविनी !
गाणीं तीं कसचीं अतां, निपजतीं हीं शोकगीतें मनीं.

बुरली १०–६–२४

---

## ३

कां माझ्या भवितव्यते ! मग अजी येणें असें योजिलें ?
हेतू काय मनीं अजूनहि कळूं दे एकदां ते भले.
कुंडाभोंति असें कशास फिरणें ? नाहीं हवी कां पुरा ?
कां प्राणाहुति वाचुनी तळमळे आत्मा तुझा घाबरा. १

छेः हें काय ? कशीं वदूं कटु वचें, देवीस माझ्या वृथा,
नाहीं पात्र जरी प्रसाद करण्या कां आस ही अन्यथा !

माझें मान्य मला भविष्य, बघ मी ही मान खालीं करीं,
माझ्या आयुवरी खुशाल अपुलें स्वामित्व देवी करी. २

स्वामित्वास करी, परी दुरुनची, हा सूर्य जेवीं नभीं
तूझें तेज असह्य, दृष्टि जळते, त्याला करूं काय मी!
मी आहेच तुझा, तुझींच हृदयीं मूर्ति प्रतिष्ठापिली
आतां एकच मागणें, फिरव ही दृष्टी परी आपुली. ३

जा देवी! परतोनि जा, तुजहुनी मूर्ती तुझी ही बरी
ही नाहीं फसवीत, जा, परत जा, पूजा हिची मी करीं!

शाजापूर आक्टोबर १९१८

---

## रुग्ण शय्येवर—

चाल—मै जल भरवाने जमुनाजीपे.

वंदु किती प्रीतिची बाळा! तव नवलाई,
रडविशी न रडत्या ताता ठायीं ठायीं. १
तूं मला मी तुला, आपण या रानांत
चाललों वाट कष्टानें अंधारांत. २

संपेल कधिं निशा ? कधीं उषा उजळेल ?
कधिं अरुणाकिरण सोनुल्या अह्मांस दिसेल ? ३

कां गाल फिके ? कां गुलाब ते मावळले ?
कां मातृचुंबनाविना सुकोनी गेले ? ४

वय तुझें पाडसा ! उडण्या बागडण्याचें,
नच केविलवाणी शय्येवर पडण्याचें ! ५

दुःखांचें ओझें नाहीं माझें सान,
घडि घडी नको भर घालूं माझी आण ! ६

घेऊं दे विसावा क्षण भुइवर टेकूं दे,
गोजिरे गाल पाखरा ! फिरुनि चुंबूं दे. ७

जयंती स्टीमर, दिसेंबर १९२२

# माधव ज्ञुलियन.

# मुरली

—*—

वृत्तः-अक्रूर

( मनाला तल्लीन करून सोडणारें व दृष्टी बदलून टाकणारें दृश्य अथवा श्राव्य अनुभविल्यानन्तर सर्व-सङ्कर्षक अज्ञेयाविषयीं हुर्हूर व एक प्रकारची उच्च असन्तुष्टता मनाला वाटूं लागणें साहजिक आहे. )

श्रीकृष्णा रे, आस न दुसरी उरली
वाजीव आपुली मुरली. ॥ ध्रु० ॥

लपलास कुठें हृदयविसाव्या कृष्णा ?
अनिवार लागली तृष्णा.
मधु मुरली ती—तगमगतो हा जीव—
वाजीव गडे वाजीव !
आत्मिक गूढा, गा तें अद्भुत गीत,
मज डोलूं दे गुङ्गींत !—
हे विश्वात्मन्, तुजवीण
चहुंकडे जिवाला शीण;
मी माझी नाहिं धनीण;
अजुनी नाही हौस कधींची पुरली,
वाजीव सुन्दरा, मुरली. १

मी प्रणयाचा कधि माधिं अर्धा प्याला
घेतें मन रिझवायाला,
चञ्चलता तो पुनरपि देई भरुनी
न खरे ते नखरे करुनी;

तो स्वार्थानें झाला मधुर विषारी,—
क्रृत्रिम ती क्षणिक हुशारी !
परि त्याची आज शिसारी
मज बसली रे संसारीं;
तव अव्ययतेवर सारी
मम आस अतां सर्वगता, जर ठरली
तर कां न ऐकविशि मुरली ? २

मज जन म्हणती; ही लोकांतुन उठली
चवचाल रीत ही कुठली ?
ही प्रेमाच्या तरङ्गते स्वप्नांत,
बरळते काय वेडांत ?
जरि असती ते पढित शाहणे मोठे
पर्वा मज त्यांची कोठें ?—
मी असतां खोल दरींत
प्रगटलें गात कुणि गीत
चेतवीत हृदयीं प्रीत
त्या तेजानें माझी दृष्टी भरली,
गीतानें वृत्ती हरली. ३

श्रीकृष्णा रे, देव तोच तूं माझा
गोविन्द जिवांचा राजा !
तुजभंवताली अवकाशीं ग्रहगोळ
नाचती सांवरुन तोल;

मधुनी मधुनी अमरसुन्दरी तारा
छेडिती रुपेरी तारा.
मुरलीची होई साथ,
जडतेवर होई मात,
—चहुंकडे जिवाचा नाथ !
त्या गीताची लकेर कोठें दडली ?
एकदांच कानीं पडली. ४

अन् त्या समयीं पडदा अपुल्यामधला
क्षणभरच खालती पडला.
तव रूपाची कल्पनाच मज नव्हती,
तों ओळख झाली नुसती.
क्षण दुनियेची बाह्य झकाकी विटली,
क्षण पूर्वभ्रान्ती फिटली;
चित्प्रकाश लक्कन् पडला,
गन्ज या मनाचा झडला,
मज छन्द एकला जडला—
ब्रह्माण्डाची जींत मोहनी भरली
ती वाजिव रे मधु मुरली. ५

मधुवनीं तिनें शीतल शान्त नितान्त
गाइला सुलभ वेदान्त;
तो ऐकोनी साध्या भोळ्या गोपी
कृष्णपदीं गेल्या झोपीं;

जादूगारा, झोंप गाढ ती आण,
तुजवरुन जीव कुर्बाण !
मी गमतें, भ्रमतें, दमतें;
मन कसें न कोठें रमतें;
चहुंकडे मोहसम्भ्रम ते !
मज ऐकूं दे तरङ्गतरला मुरली
चिच्छक्ति जींतुनी स्फुरली. ६

तूं हृदयेशा प्रेमवैद्य, मी याचीं,
बघ दशा संशयात्म्याची !
मधु मुरली ती लाव कशी ओंठांना,
तानांवर घेई ताना.
मग वाहूं दे अमृत–जान्हवीतोय;
कर वैकुण्ठाची सोय.
भावना करी अभिसार,
प्रेमाचा साक्षात्कार
इच्छितें—तूंच आधार !
कर दार खुलें वाजवीत मधु मुरली—
प्रभु, आस न दुसरी उरली. ७

ऑगस्ट १९११

---

# चिमुकली शान्ता

**वृत्त**:–वधूवल्ली

चिमुकले शान्ते ! हास्य फेंक चार दिशांतें ! ॥ ध्रृ० ॥

हृदयाचीं बघ दारें उघडीं,
हांक मारिते प्रीति हरघडी,
खेळ तिच्याशीं झिम्मा-फुगडी. १

वरस तुझ्या नयनींचें पाणी
बाल्यीं पुनरपि मज जें आणी;
म्हण लडिवाळ तुझीं तीं गाणीं. २

किती पांखरें उडतीं रानीं,
विविध सुरांवर गातीं गाणीं—
त्या सर्वांची परि तूं राणी ! ३

स्फटिक-द्रव विजनीं झुळझुळतो,
गान अखण्ड करी मंजुळ तो;
सूर तसा तव खुलतो, डुलतो. ४

उष:प्रभेहुन अभिनव सुन्दर
हास्य तुझें फुगऱ्या गालांवर
लास्य करी तें सहज मनोहर ! ५

लहर जिवाची तव आनन्दी,
–जणूं उषेची झुळुक सुगन्धी–
बागडते पुरती स्वच्छन्दी ! ६

केस दाट रजनीसम काळे,
कुरळे, त्यांचें किति मृदु जाळें—
त्यामधिं मी सांपडलों बाळे ! ७

अवसेची ती ढगाळ रजनी,
स्मित उत्तेजक एकच वदनीं,
ती तूं तारा मज या भुवनीं. ८

ता. २ फेब्रुवारी १९१३

---

# विमला आणि अशोक

वृत्तः–उद्धव

( आकाशांतील अनन्त तारे हे मृतांचे आत्मे होत असा एक समज अनेक ठिकाणीं प्रचलित आहे. )

" खाळून चन्द्र वर आला सर्दार बाळ बघ खांसा ! "
तों " कुतून आलों आई ? " बोलली बाल–जिज्ञासा.

* * *

अङ्गणीं लाडका खेळे आईचें बोट धरूनी,
दुडदुडां तिच्या भंवतालीं तो फिरे मधून मधूनी,
चान्दण्यांस न कळत दावी स्फटिकावलि मुख उघडूनी,
बोबडे बोल लाडाचे वाऱ्यावर जाती तरुनी,

तों बाल-विचार हवाई
प्रगटला-काय नवलाई !
“ मी कुतून आलों आई ? ”
चुम्बिलें तिनें उचलूनी त्या मूर्तिमन्त उल्हासा. १

सडपातळ उन्च तनूची क्षौम शुभ्र खुलवि खुमारी,
आजानु रुळे परि हट्टी तो रुन्द पदर जर्तारी;
ती सैल गांठ केसांची मानेवर गोऱ्या लोळे;
फटफटीत भव्यकपाळीं गालींहि खिन्नता खेळे;
डोळ्यांमधिं चमक हुशारी
माधुरी शान्त सुखकारी;
चन्द्रिकाच ही अवतारी !
पाहिला न हृदयेशानें हा अशोक बाळ दिलासा. २

“ साङ्गना, साङ्गना आई ! ” जिज्ञासा आतुर झाली;
ती पोरमाय गोन्धळली जाहला जीव वर खालीं.
कापशी ढगावर पडला चन्द्रमा; दृष्टि वर जाई,
तों बाळ अधीर म्हणाला “ तितनं का आलों आई ?
बोलावन त्याला पाऊं !
नाहीं तल आपुन जाऊं !
तान्दन्यांत केलत लाऊं !
तो बघे वरी; ही सोडी थाम्बूनी लाम्ब उसासा. ३

हवाई=वायवी.

चल अशोक बाळ निजाया निजण्याची झाली वेळ;
चान्दण्यांसङ्गतीं खेळूं मग एके दिवशीं खेळ. ”
चालला उड्या मारीत टाकुनी बाळ फुलबाग,
उन्चावर शयन–महालीं आईच्या मागोमाग.
आईला बिलगुन निजला,
विस्मृतींत सत्वर विरला,
परि पदर विमलचा भिजला,
स्वप्नमयी झोंपीं गेली ती चिन्तित आत्म–निवासा. ४

ता० ८ फेब्रुवारी १९१४

---

# प्रेमाची परीक्षा नको

वृत्तः—वियोगिनी

सखये, तुजपासुनी दुरी असतों मी, परि हें न वाउगें;
दुरुनी दिसतेस देवता जवळूनी दिसशील तूं कशी ? १
भंवतीं पसरे मरुस्थळ, वरती तीव्र रवी प्रकाशमान्;
प्रतिबिम्बित ज्यामधें तरू तिकडे दूर असें सरोवर. २
नयना जरि रम्य ही दिसे परि ही क्रूर खुनी मरीचिका ;
तुज भास गणूं ? चुकेन मी दिसशी सुन्दर पुण्य बालिका. ३

नुकते फुलेल गुलाब हे तव गालांवर हृद्रसन्त कीं !
नकळे परि या मुखांतुनी प्रणयोद्गार—सुगन्ध ये न ये ! ४

तुझिया नयनांतलें जल हिमबिन्दूच जणूं प्रभातचे !
वदनावरची छटा जणूं बरसातींतिल ऊन कोंवळें ! ५
घनकेशकलाप काजळी जणुं लाटा उठती जळावर,
जळ खोल, ढगाळ अम्बर, वरतीं चञ्चल वायु खेळतां. ६
तव भाषण मन्द मोजकें मधु, निष्पाप, सलज्ज, मोकळें—
भरल्या जणूं मोहळांतुनी मध खालीं ठिबके हळूहळू ! ७
हृदयांतिल माधुरी तव बहिरङ्गावरुनी कळे मला,
दुरुनी सुख हो जरी कमी, न परीक्षा तरि पाहणार मी, ! ८

ता० ६ ऑगस्ट १९१४

---

## आठवणारें पहिलें चुम्बन

**वृत्तः**—शार्दूलविक्रीडित

आई, हें पहिलेंच चुम्बन तुवां माझें अतां घेतलें;
त्याची शान्तसुखानुभूति न कधीं जाईल चित्तांतुनी.
डोळे उत्सुक आणि तोण्ड रडवें माझें बघूनी तुवां
खालीं वांकुन ओठ ते भिडविले डाव्या कपोलावरी.

मरीचिका=मृगजळ

माझे हात करून उन्च तुझिया आई, गळयाभोंवतीं
प्रीतीचा वळखा, सुटेल न कधीं ऐसा तदा वातला.
देवा रे, झटलें मनीं, बिलगुनी मी घट्ट राहों असा !
आईच्या पदराशिवाय जगतीं कोठें दुजा कोंवसा ?

ता. २६ ऑगस्ट १९१४

---

# वाग्यत मोहिनी

**वृत्तः**— केशव करणी

जणु चिन्तांचा समूह सारुन मागें तूं बान्धिला
भव्य हा तव अम्बाडा ढिला.
पुढें विराजे स्वयम्जीव हा आस-गोल मोहक-
चेहरा तुझा प्रीति--पोषक.
त्याच्या हास्यें भाव-सिन्धु मम हेलावूं लागतो,
तयावर मी वाहत राहतों.
कधिं मजला स्वर्गासन्निध तो उचलितो,
कधिं अन्धारामाधिं खोल खोल ढकलितो,
तट दूर राहिला, तळासहि न बसवितो;

कोंवसा=आश्रय.

सागर न कधीं आटायाचा—असह्य माझी स्थिती !
तयाची तुज आहे का क्षिती ? १
धाव धाडशी मना पण हळू हृदयोद्यानाकडे,
पडलें जर पाउल वांकडें
हनूवरिल त्या खळींत पडुनी हळहळशिल अन्तरीं;
परि पुढें नवल काय हें तरी ?
दोन माणिकें अखण्ड, त्यांच्या बन्द कवाडांवर
दिसते मौनाची मोहर;
विहरती अन्तरीं भावसारिका किती !
वाटें नहि त्यांच्या उत्कटतेला मिती,
बाहेर पडाया झेंप जणू टाकिती !
ओंठ खालचा किञ्चित सरकुन उत्सुकता भासवी,
निग्रह परि न मुखा हांसवी. २
गहिरे डोळे का असतीं हीं प्रसन्नतेचीं तळीं,
जयांच्या स्फटिकशुभ्र हिमजळीं
शामी झेनोबियासारख्या दोन श्यामसुन्दरी
तरङ्गति डौलीं बदकापरी;
नर्मद्युतिची झुळुक लागतां नाचाया त्यावरी
उडती कटाक्ष त्यांची सरी

गहिरे=गम्भीर; भोर; सतेज. झेनोबिया ही पामिराची शूर व रसज्ञ राणी होती.

न कधींहि नर्मदातुषारांस येइल
जे उडतां तनुवर शान्त होतसे दिल;
हे कटाक्ष देउन सुख करिती विव्हल,
करामत अशी नयनांची जीं असति बदामाकृती,
तयांची सदैव ताजी स्मृती. ३

गुजराथेच्या सुपीक उष्ण तप्त जमीनीवरी
मृगाच्या अल्पायु अशा सरी
मधुन मधुन पडतां वर येई भूगर्भित वैभव,
उदय घे हिरवा मोसम नव;
परिणाम तसा मजवर घडला तव मधु मृग-लोचनें
वरसतां मोहक मन्देक्षणें;
परि मग आर्द्रांना लवहि न आला द्रव,
नयनांतुन पडला उष्णजलाचा स्रव
पाहून ढगांचें शुष्क रङ्गलाघव;
वर्षर्तूही सम्पत आला, रङ्ग दिसेना बरा,
तृषेनें जिव झाला घाबरा. ४
परन्तु कोजागिरी अहा ती पावन सुखशीतल !
जणु सुधा चुम्बी अवनीतल
विश्व लावुनी समाधि बैसे दिव्यतत्वचिन्तनीं
प्राण तो ब्रह्माण्डीं चढवुनी;

प्राण तोच हा पूर्ण चन्द्रमा, तपस्तेज चान्दणें,
चहुंकडे शान्तीचें नान्दणें,
मधु तरङ्ग उठती मनीं साहजिकपणें,
झालींच तरीं तीं काव्यात्मक भाषणें,
जाणीव मना हो रोमाण्टिक हें जिणें—
तुझा मुखाविर्भाव अश्विनी विमल कौमुदीसम,
न होई मनास परि उपशम. ५

असें कसें ? तर अर्थ कळेना त्याचा मज वल्लभे;
आणि मज वेड असें हृत्प्रभे !
बाळ कौतुकें पाहत राही काळ्यावर पाण्ढरें,
क्षणीं ती जिज्ञासा ओसरे.
रत्नजडित जे लेख या निळ्या घुमटावर ते निशीं
वाचितो वेडावुन ज्योतिषी;
पाहतों तयासम तुझ्या चेहऱ्याकडे,
परि गूढार्थ मला झटूनहि न सांपडे,
कधिं दुर्लक्ष्याची त्यावर छाया पडे,
शरदभ्रासम ती, तिज बघतां भलतें वाटें भय,
परि तें प्रेमीं पावे लय. ६

तुझा मोकळा गळा गमे मज हरि–वेणूसारखा;
पहा या अखण्डगति तारका !

अवकाशीं त्या रास मण्डलीं फेर धरुन नाचती
प्रमोदें का कम्पित भासती ?
वृन्दावनिं ऐकुन सुरमुरली प्रीतियोगसाधिका
हो जशी कम्पिततनु राधिका ?
या दिव्यदेहिनींना येई ऐकुं का
तव गान भानहर ? का भ्रम मज हो फुका ?
प्रेमाकुल मानस सहज करी या चुका.
हृदय हरी ही तुझी गीतिका झुळुक जशी परिमल;
करी ती लुब्ध आणि विव्हल.
स्वयंप्रेरणेंचें गुणगुणणें तुझें जागवी मशीं
अर्जुना भगवद्गीता जशी;
उजळा देई विकारमोहाकुल माझ्या मानसा,
त्यावरी पाडी अपुला ठसा.
गोड शब्द हळु मनांत बोले. " उत्तिष्ठत जाग्रत !
चालवी कर्तव्याचें व्रत. "
उन्नति-दुर्गाच्या चढणीवर मञ्जुले,
चिन्तीत तुला टाकिलीं हळू पाउलें,
तुज वळुन पाहतों, -मानव मी, कधिं भुलें.
रोंख कळेना तुझा, आणि हा भाला शिरला उरीं !
बघशि का जरी राहशीं दुरी ? ७

ता. २३ आक्टोबर १९१६

---

# निराशेतील समाधान

वृत्तः—माधवकरणी

प्रेम कुणाचें मजवर नाहीं हें खडतर दैव,
    असे ह्या तथापि आनन्द;
असती कोणी ज्यांवर माझें प्रेम सर्वथैव,
    न त्याला कसला निर्बन्ध;
मी न भिकारी, हृदयीं माझ्या प्रेमाचा सांठा,
    लुटा हो लुटा सान्धि हीच !
पळूं नका मोकळ्या तुह्मांला जरी दह्म वाटा,
    नसे ह्या खजानजी नीच.
प्रेम करीं मी, दगड नसें हें नसें काय कांहीं ?
    हृदयीं ही अमृतगङ्गा !
शोण कुठें, यमुनाहि कुठें या विचित्र शङ्कांहीं
    कां करूं तिच्या वृत्तिभङ्गा ?
        हृदयजे, वहा वहा सन्थ;
        कशाची नसो तुला खन्त;
प्रयाग येतां हृदयङ्गम सङ्गम होय अनन्त,
    नको तूं आज ह्मणूं ' हन्त ! ' १

रत्न निपजलें, तें भूगर्भीं दडलें अन्धारीं,
आली वरी गारगोटी;
रविकिरणें चुम्बितीं, तिशीं खेळती मुलें भारी
प्रतिष्ठा परि ती का मोठी ?
वाङ्मोहन साधिलें जयानें असा रसज्ञ कवी
राहिला लोकीं अज्ञात;
चन्द्रशेखरा, तथापि कविता तुझी मला झुकवी
फुलाला जसा उषावात.
रसिक नसेना कुणी ? जन्म ये मला गुलाबाचा
त्यास मी लेखुं कसा तुच्छ ?
ख्रिस्त-शिरीं बैसला ह्मणुन का कण्टकमुगुटाचा
होई कधीं सुमनगुच्छ ?
विहङ्गम होउन गाईन
ऐकाया जरि कोणी न ;
इन्द्रधनूला पाहीना कुणि मूर्ख दृष्टि-हीन
म्हणुन का वैभव तें दीन ? २
प्रेम तुझें मजवर नाहीं हें सखे, जाणतों मी,
नको तूं पुनःपुन्हा साङ्गूं !
पडली आहुति या जन्माची प्रेमाच्या होमीं,
आणखी काय दुजें मागूं ?

अल्लानें त्या निम्रूदाच्या भव्य अग्निकुण्डीं
  निर्मिली बाग थण्डगार;
अदाह्य इब्राहीम मधोमध, मलकांच्या झुण्डी
  भोंवतीं करीत सञ्चार.
मी न परी बागेंत देह हा अणू अणू जळतो;
  त्यांत मज समाधान वाटे;
एकतानता परी भङ्गतां आत्मा कळवळतो,
  फुलांचे मग बनती कांटे !
    म्हणून न माझी फिर्याद,
    सदोदित तुझी असो याद;
फिरेन मी जडमुक्त होउनी नभीं अमर्याद;
  सारखा तुझा मला नाद. २

ता० १० आगष्ट १९१७

निम्रूदानें इब्राहीमचा मूर्तिभञ्जनासाठीं छळ केला व अल्लानें त्याची लाज राखिली ही गोष्ट हिरण्यकश्यपानें प्रल्हादाच्या केलेल्या छळाच्या गोष्टीसारखीच आहे.

मलक=देवदूत

# चुकामूक

वृत्तः—उद्धव

दारास कडी लावूनी ध्यानस्थ आंत मी बसलों,
परि दारावरुनी गेली ती ध्येयमूर्ति—मी फसलों.

कुणि करिल भङ्ग ध्यानाचा लाविलें म्हणूनी दार;
एकान्त पाहुनी बसलों कीं नको व्यर्थ जोजार;
वाजतां कुठें पाचोळा बोललों: ‘ खेळते खार. ’
परि दयिता जिवलग तरुणी
ती गेली दारावरुनी—
पाहिली न डोळे भरुनी !
तिन्हि सान्जा टळल्या, पडला बाहेर आंत अन्धार. १

स्तुतिकाव्य लिहाया बसलों यमकास यमक जुळवीत,
स्वरभावयोग साधाया हृदयाची तार पिळीत;
गुरफटलों, रस्ता चुकलों परि शब्दांच्या अटवींत;
परि अवतारी ती कविता
सङ्गीततरङ्गिणि ललिता
योगच हा—तिज आळवितां
येउनी परस्पर गेली; विरसलें हृदयसङ्गीत. २

सजविलें फुलांनीं तुझिया चेतनाविहीन छबीला;
सजविलें तयांनीं असतें तव लाम्ब सैल वेणीला;
का फुलांस आशा नसती ? कां केलिस भलती लीला ?
दारावर टिचकी नसती
मज पुरे जाहली असती;
वेणीवर मग तीं हंसतीं
भेटतीं हंसत बदलाच्या अव्यक्त अशा आगीला. ३

ठेवीन सदोदित आतां दारास खुलें यापुढतीं,
ठेवीन लावुनी दारीं स्नेहाची साधी पणती,
ठेवीन झिजवुनी काया ती ज्योत जागती पुरती;
सिञ्चीन नयानिंचें पाणी
गुणगुणत अङ्गणीं गाणीं
येणार जिवाची राणी !
येण्याची तुझिया माझ्या झोंपडींत मोठी महती ! ४

ता० २५ जुलै १९१७

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. 2888

# कुणीं काय बान्धिलें ?

वृत्तः—स्वर्गङ्गा.

तेज जयाचें पाहुन दिपते होउन जाते मूढ गिरा;
कोहिनूर जणु ! शिल्पकलेच्या मुगुटामधला श्रेष्ठ हिरा.
सुन्दर मन्दिर असें देखतां रडुन मुलापरि काळ ह्मणे:
“ धर्म नको मज माझा, किंवा नलगे या पुढती जगणें ! ”
काय नवल जर अमृत टाकुन बघण्या अमर इमारत ती
यमुनाकांठीं करिती दाटी डुम्बुन नेत्रसुखीं रतती ?
रवितापानें वितळेना जर हिममन्दिर मी यास ह्मणूं;
कर्पूराचें ? गन्ध नसे, तें उडुन न जाई अणू अणू.
कीं हा मण्डप कुन्दफुलांचा ज्यांत विराजे अरब-कला
कुराण-वचनी रत्नहार तो घालुन अपुल्या दिव्य गळां ?
पुण्य कुणाचें रूप असें घे हृदयङ्गम सङ्गमरवरी ?
मूर्त चारुता बघतां सङ्गम पावति चित्ताच्या लहरी.
स्मारक धन्य ! प्रीति धन्य ती ! धन्यच बेगम मुम्ताज !
चिरनिद्रेचें स्थान जिच्या हो मन्दिरराज असा ताज.
फिका पडे तव कवितामूर्तीपुढतीं इतरांचा नखरा,
शहाजहान् ! तूं धन्य विलासप्रिय वल्लभ ! तूं रसिक खरा ! १६

भस्म चर्चुनी कृष्णमूर्ति हे कोण उभे जागोजागीं ?
बैरागी का सुकाळले जे हिन्दुस्थानीं हतभागी ?
गाम्भीर्याचे वा स्थैर्याचे अवतारच हे उभे खडे,
ज्यांच्या डोळ्यांसमोर झाले अनेक शाह्यांचे तुकडे.
हतबल यांच्यापुढें जाहले सृष्टींतिल राक्षस जुलमी,
सह्यसुतांना सह्यच सोरें, स्थिति तीं एक समीं—विषमीं !
भुऱ्या काजळी जटांसङ्गती भुताटला वारा खेळे,
झोडपीत झाडांतें तुन्दिल दोन्दावरुनी तो लोळे !
प्रसन्न करुनी कुणी घेतले किम्मत ओळखुनी यांची
मावळ देशीं रास ओतिली नव ध्येयांची श्रेयांची ?
शैलस्तम्भांवरी बान्धिला कुणी घुमट शिवशाहीचा ?
नौबत झडतां ध्वनि दुमदुमला हिन्दुत्वाच्या द्वाहीचा !
गतविभव असे गड ज्यावरतीं फडकेना झेण्डा भगवा,
वायुमुखें जो बोध पुकारी " स्वसंस्कृती जगवा तगवा."
त्यांत रायगड ! राय गडांचा ! रायांचा गड आवडता !
दक्ष असा शिवरक्षारक्षक ! स्वामिनिष्ठ चढतां पडतां.
धन्य रुस्तुमी, धर्मप्रीती राजनीतिनैपुण्य तसें !
धन्य शिवाजी राष्ट्रब्रह्म यच्चरितीं वैगुण्य नसें ! २४

स्थळें शोधुनी निसर्गसुन्दर तीर्थोतीर्थी घाट कुणी
धर्मसराया बान्धुन केले एतत्परदेशीय ऋणी ?

आणि कुठें मठ, कुठें देवळें, कुठें तलावहि, कुठें कुवे !
—आसेतुहिमाचल या देशीं देती लोक कुणास दुवे !
विद्याभिक्षुजनांस्तव केलीं फुकट भोजनालयें सुरू,
संसृतिचिन्तेतुनि सोडविले विद्याध्यापक धर्मगुरू,
खैरातीची जिच्या खासगी खजिन्यांतुन वाहे सरिता
गङ्गाजल-निर्मल ती साध्वी कवण स्वर्गङ्गाचरिता ?
अनुकूल अशा इहसुखभोगां विमुख होउनी संन्यास
निदिध्यास घेतला शिवाचा—क्वचित साधला अन्यास.
राजयोग जनकाचा नाहीं भाकड गोष्ट पुराणींची,
रहस्य दावी इतिहास-कथा थोर अहल्याराणीची.
मल्हारीची सून होळकरकुलोद्धारिणी महासती !
धवलगिरीसम सत्कीर्ति तुझी अचल धवल राही जगतीं. ४८

प्रेक्षणीय वस्तू म्हणुनी कुणि पर्वतीवरी दाखविती
हौद, कशाचे आणुन चित्तीं गतसुखकाला आठविती;
पक्वान्नाचे म्हणतां कोणा तद्गन्धहि येई त्वरित,
महाभोजनांचें हो स्मरणीं ताजें वर्णन रसभरीत.
थू त्याच्या जिनगानीवरतीं ज्याचे हें स्मारक दिसतें !
भग्नहृदय हो मर्द मराठा, जग उपहासानें हंसतें.
लाडुबहादुर, कामान्धातुर, वाक्चतुर परी जो बाजी
भेंकड, पाजी, महाल-गाजी, त्याची ही फन्नाबाजी. ५६

ता० ६ एप्रील १९१९

# हट्टी प्रेम

—*—

गज़ल; वृत्त-वियद्गङ्गा

मिळेना अन्तरीं तूझ्या मला थोडाहि ओलावा
ह्मणूनी प्रेम सोडावें, न तूं हा बोल बोलावा. १

जशी तूं दाविशी भीती तशी ही वाढते प्रीती,
नकोचा अर्थ हो ऐसा मजेचा बायकी कावा. २

धनुष्यें बाण घेवोनी खडे डोळे तुझे दोन्ही;
कुरङ्गी-दृष्टिसम्पातें कुणाला होय पस्तावा? ३

हनुस्थानीं खळीमाजी पडाया जो नसे राजी,
तयानें मात्र या मार्गीं जपूनी पाय टाकावा. ४

न कोठें भीति पान्थस्था; कुठेंही जा, खुला रस्ता.
परी तूं सूचना देशीं-न जावें प्रीतिच्या गांवा. ५

न जाई मी, मला ओढी तुझें लावण्य, ना सोडी;
न कैशी धांव घे धेनू हरीचा ऐकुनी पांवा? ६

दिव्याची दाहक ज्योती पतङ्गा घोळवी भोंतीं,
मला आकर्षिशी तैशी किती हा गोड दुष्टावा! ७

निखन्दा वा कुणी वन्दा, सदाचा थोर हा धन्दा.
न होवो फायदा यन्दा, बघुं अन्तींच आढावा. ८

जिव्हाळ्याची जिथें भक्ती, न खोटी हांव आसक्ती,
नको सत्ता, नको सक्ती, निराशा घे कसा चावा ? ९

असेना मूर्ति पाषाणी, तिला देवत्व जो आणी
न त्याला कोण वाखाणी, न वन्दी तन्मनोभावा ? १०

ता. २७ जून १९१९

---

# अङ्गाई

वृत्तः-अक्रूर

निज नीज अतां आनन्दा, लडिवाळा
अङ्गाई माझ्या बाळा. ॥ ध्रु० ॥

रस्त्यांत पहा फक्त दिवे लुकलुकती,
ओसाड शान्त पथ दिसती.
गाडी-घोडा, बायसिकल, मोटार
कांहीं न अतां दिसणार.
कुर्र्-घण्-घण्-पों, आवाज न ये कानीं
माझींच ऐक तूं गाणीं;
मी तींहि हळुहळू ह्मणतें,
कीं स्वतांशींच गुणगुणतें,
शेजारीं माणुस कण्हतें,

[library stamp]

त्या झोंपूं दे, तूंहि झोंप ये बाळा;
मजलाहि येइ कण्टाळा. १
तूं परि जाशीं झोपीं गाढ दुपारीं,
अन् रात्रीं छळशी भारी.
डोळे माझे इकडे चुरचुर करिती;
ओळख तुज कोठें परि ती ?
तिकडे त्यांचा खाउन साधा गोळा
नुकताच लागला डोळा;
तों तुला उजाडे इकडे,
भलतेंच असें काय गडे ?
डोळे हे हंसेर उघडे.
तूं मोत्याचा सुबक इमुजी दाणा,
निज, माझा बाळ शहाणा. २
सोडुन जाशीं दूर; काय तुज वाटे
माण्डीवर रुतती कांटे ?
बघ ही तूझीं बाळें खेळामधलीं
तव अन्थरुणावर निजलीं.
तूं नीज कसा, करूं नको पुण्डावा;
छळ किती बरें माण्डावा ?
देवाची येइल फेरी,
कोंवळें ऊन सोनेरी
पसरेल आंत बाहेरीं.

त्या वेळीं तूं खेळ ग्यालरींत बाळा
निज आतां पण लडिबाळा. ३

तुज थोपटतें, माण्डीवर मी घेतें
झोंकेहि हळूहळु देतें;
विश्रान्तीला जर माण्डी आईची
तर दौलत पाच्छाईची.
मज दुर्मिळ ती, जीवर ठेवुन डोकें
भोंवतील विसरुन धोके
वाटतें यथेच्छ रडावें,
अन् पदराखालिं दडावें
भिजवीत वस्त्र पहुडावें,
ती प्राप्त तुला, नीज, नसेना बाळा ४

पाळणा अगर झोंपाळा !
आकाशाच्या चाळणीतुनी खालीं
जो प्रकाश शारद गाळी,
वर येई तो मिरवित अपुली शोभा
हा बाळमित्र चान्दोबा.
हा बाळांना आला निजवायाला
कर नमस्कार तूं याला,
हें तबक जणू सोन्याचें,
पाहतां सोनुलें नाचें,
चिमुकले हात हे याचे

धडपड करिती त्यास धराया:—बाळा,
शिवशील कसा आभाळा ? ५

मज बाळपणीं धरुन उराशी आई
बाहेर अङ्गणीं जाई,
साङ्गत गोष्टी काउ-चिऊ-माऊच्या
अन् आवडत्या खाऊच्या;
भरवित बोले:—झालें; घे हें इतुकें!
चान्दोबा हांसे कुतुकें.
हा तेव्हांचा खेळगडी
मनलहरीसङ्गें फुगडी
खेळुनी अन्तरा उघडी
जारे रुसे लपे,—स्वभाव पडला लहरी,
फु:गडी सदाची न करी. ६

आई ! आई ! कां ग बरें पुनवेला
स्मृतिछबीस येई तजेला ?
का देवाच्या घरुन पुन्हा तूं येशी
भेटाया तव तनयेशी ?
मधु बाल्याच्या आठवणींचा पेला
कितिकदां रिकामा केला,
तो तरी पुन्हा भरलेला,
जीव ही पुन्हा तान्हेला
ह्मणुं तरी काय या खेळा ?

तव ममतेला त्यांतुन पान्हा फुटतो,
पाऊस दुधाचा पडतो. ७

आकाशांतें प्रसन्न श्यामल शान्त
देखितां मज पडे भ्रान्त—
प्रतिबिम्ब तुझ्या वदनाचें तर नाहीं ?
खातरी पटे मजला ही—
स्वार्थत्यागापासुन ये तुज शान्ती
ती पसरे सकल दिशान्तीं;
सूर्याचें तेज गिळूनी
त्यांतला ताप वगळूनी
दे थण्ड तेज उलटूनी
त्या चन्द्राचें आणि तुझ्या चरिताचें
मज दिसें साम्य तें साचें. ८

तूं प्रभुपाशीं दूर, तशी मजजवळीं,
माया तव मजला कवळी.
प्रारब्धाचा उलटा पडतां फांसा
मज देशी धीर दिलासा.
वात्सल्य तुझें निस्पृह अक्षय, आई !
मी होउं कशी उतराई ?

वारसा मातृहृदयाचा
जो मला मिळाला, त्याचा
हो मालक कलिजा माझा–
गेला झोंपीं, माण्डीही जड झाली
उचलुनी ठेवितें खालीं. ९

ता० ८ सप्टेंबर १९२०

---

# तुझा मी, तूंहि हो माझी

गज्जलः–वृत्त वियद्गङ्गा

बुजावूं मी किती तूंतें ? करावी मी किती हांजी ?
कितीदां मन्त्र उच्चारूं ? तुझा मी, तूंहि हो माझी. १

उभे मल्लोचनीं आंसू, कपोलीं अन् तुझ्या हांसूं;—
नको गे जिन्दगी नासूं ! असे का इश्क ही बाजी ? २

उन्हाळे पावसाळे अन् हिंवाळे लोटले–भगवन् !
अजूनी मूळ भक्तीची कळी ही देख तूं ताजी. ३

फुलांचे कुञ्ज हे नामीं, रमूं गे ये सुखारामीं;
वसन्तीं जीविताच्या मी, तशी तूं–सोड नाराजी. ४

असेना हीन मी प्राणी ? न पर्वा, तूं महाराणी !
धिटाई शुद्ध इश्काची मला दे कौल ‘ हो गाजी ’ ५

बसूनी ध्येयचक्रीं मी निघालों स्वर्ग जिङ्काया,—
धुळीला वातचक्रींच्या न कोणी क्षुद्र बोला जी. ६

उमेदी धावत्या माझ्या तुझ्या प्रीतीविना पङ्गू—
न होशी तूंच मस्तानी, कसा गे होउं मी बाजी ? ७

बहाणे तूं नको साङ्गूं, नि ताज्या मागण्या मागूं—
हृदींच्या गुप्त रत्नाची करावी काय हर्राजी ? ८

करीं या लोम्बते माळा, नसे तोटा मुहूर्ताला,
पटूं दे आज दोघांला, तुझा मी आणि तूं माझी. ९

ता॰ ३० मार्च १९२१

बुजावूं=समजावूं. बाजी=खेळ. कौल=( ईश्वरी ) वचन. गाजी=जेता. हर्राजी=लिलाव.

---

# एक घाव

वृत्तः—मन्दाक्रान्ता.

'एक घा'—कलापी

हा त्या पक्ष्यावर दगड मी फेंकतां फेंकिला कीं !
झालें हातांतुन निसटतां चर्र या काळजांत !
त्याच्या छातीवरच बसला, श्वास कोण्डून जातां
खालीं आला तरुवरुन तो पङ्ख होतांच जाया.
मी पाळूनी, तडफडून ये मृत्यु माझ्याच हातें !
पाणी टाकीं धडपड उरीं–तो उठाया शकेना.

कैसें व्हावें ? जखम हृदया जाहली क्रूर हातें;
भारी त्याचें हृदय कंवळें, तो कुठूनी उठावा ?
आहा ! झाली पण कळ कमी, नेत्र केले खुले हे !
मृत्यू हो वा सहजच पुनर्जन्म हें कोण जाणे ?
गाणीं गाया मृदु मधु पुन्हा वांचला हा अहाहा !
या बागेचीं रुचिकर फळें चाखण्याला उठे हा.
माझ्यापाशीं फिरून कधिं तो ये न पूर्वीप्रमाणें
आला केव्हां तरि मज भिई आणि पाही उडाया;
गेली श्रद्धा पुनरपि कधीं कांहिं केल्या न येई !
झाल्या घावा विसरुं शकण्या शक्ति कोणास नाहीं.

ता० २० मे १९२१

---

# आईची आठवण

वृत्तः-आनन्दकन्द

प्रेमस्वरूप आई आनन्दशान्तिदायी,
बोलावुं तूज आतां मी कोणत्या उपायीं ?
तूं माय, लेंकरूं मी—तूं गाय, वासरूं मी;
पान्हा कुणास फोडूं ? देवा कसें करूं मी ?
कान्ह्यास दूखोनी गेली कुठें यशोदा ?
पान्ह्यास आटवोनी गेली कुठें पयोदा ?

गोळ्यास पोटच्या जी तोडी पिळी स्तनांतें,
आगींत घे उडी जी, पाही न यौवनांतें
नैष्ठुर्य त्या सतीचें तूं दाविलेंस माते,
अक्षय्य हृत्प्रभूचें सान्निध्य साधण्यातें.

हा लोक सोडण्याची केलीस फार घाई,
एकूलत्यास सङ्गें नेलेस कां न आई ?
काळें मदीय अश्रू तैं पूशिले स्वभावें,
गेलीं अनेक वर्षें, घे तैं स्मृती न चावे.
ब्रह्माण्ड आठवे गे आतां परन्तु सारें,
पेटे चिता मनीं या, साह्यास काल-वारे.
तुझ्याविणें जिणें हें बाधा जणूं क्षयाची,
तत्काळ मुक्ति आई मी ईश्वरास याची.
विद्या-धन-प्रतिष्ठा लाभे; नसे गरीबी
जीवन्त कां समाधी यावी अशी नशीबीं ?

माझा वियोग आई, हो सह्य तूज केवीं ?
कैलास सोडुनी ये पोरास भेट देवी !
का त्वत्स्वतन्त्र आत्मा माझ्या फिरे सभोंतीं,
अन्धा दिसे न ज्योती, चित्तीं सदा नमों ती !
हृन्मन्दिरांत माझ्या मातृस्मृतिप्रतिष्ठा;
चाले अखण्ड पूजा, राही अभङ्ग निष्ठा.

तत्रापि हौस माझी आई, मुकेल राही;
वात्सल्यबाल्यलीला स्वप्नांत मात्र पाहीं.
संस्कार मानसीं या आई तुझे न झाले–
न्यूनत्व त्यामुळें गे मत्संस्कृतीस आलें. १५
वाटे, इथून जावें, पाशीं तुझ्या निजावें,
चित्तीं तुझ्या ठसावें, नेत्रीं तुझ्या हंसावें.
वक्षीं तुझ्या स्वतांचें ठेवीन तप्त डोकें,
त्वद्भाव शान्तवाया देईल मन्द झोके.
घे जन्म तूं फिरूनी येईन मीहि पोटीं—
खोटी ठरो न देवा, ही एक आस मोठी ! १८

ता० १७ सप्टेंबर १९२१

## गर्वहरण

—:०:—

कोणाच्याहि पुढें कधीं न नमलें गर्विष्ठ माझें शिर,
केलें मी न खुलें कुणासहि कधीं हें पुण्य हृन्मान्दिर,
डोळ्यांतून कुणापुढें न पडले अश्रू कधीं बाहिर,
स्वातन्त्र्यप्रिय हा स्वभावच असे माझा सदा गम्भिर.
होतां दर्शन गे दुरूनच तुझें मी वांकलों तत्क्षणीं,
केलें दार खुलें सताड, वदलों, "ये श्यामले साजणी !"
मद्वृत्ती क्षण तीन चार चळली भीती-कुशंकावळें,
जातां टाकुन तूं प्रभूत गळलीं डोळ्यांमधूनी जळें.

ता० ६ जून १९२२

# राजकन्येस जोहार

लावण्यमञ्जरी दिव्य परी
मी कसा तुजवरी प्रेम करी ?

मोर कुठें तो कुठें पारवा ?
व्याध कुठें तो कुठें काजवा ?
भलतिकडे जरि झुके ताजवा,

निश्शङ्क रङ्क मी प्रेम करी–
प्रीती न बघे कधिं बरोबरी ? १

परिवार झुले तुझ्या सभोंतीं,
नजराणा तुज रत्नें मोती !
प्रीति नम्र ही आणि सचोटी

ठेवितों दुरुन पायरीवरी—
स्वीकार करुन उपकार करी. २

क्षणभर दृष्टी तुझी सुधामय
वरसुन मजला करी निरामय;
सुचवी मजला दुरुनी आश्रय.

मी उन्हांत माझें काम करीं,
जोहार तुला घे दिव्य परी ! ३

ता० ९ फेब्रुवारी १९२३

# शेवटल्या भेटीस

[ सुनीत ]

हा ताशीव उभा कडा हळुहळू छातीवरी घेउनी
येतों मी तुझिया नजीक चढुनी त्या विन्चुकांव्यावरी;
गेला झाडिंत गर्द गांव वतनी केव्हांच तो लोपुनी !
छायाचित्र तुझें वरी उमटलें रेखीव रक्ताम्बरीं.
अन्तश्चक्षुंपुढें छबी परि तुझी रङ्गीत ती शोभते–
त्वत्पर्युत्सुक आननीं टवटवी ताम्बूस खेळे नवी,
घेशी तीट शिरावरून पदरा दांतीं, उडे टोंक तें;
दृष्टी निश्चळ टेंकडयावर भुऱ्या, टेंकावया ये रवी !
वाजन्त्रीं झडतीं, मधेंच पडती कानीं शुभाचे ध्वनी,
घारींच्या घिरव्यांकडे मन गमे सारें तुझें लागलें:–
पायीं ठेवुन हात, माळ वरती वाहून जावें क्षणीं
शोधाया यम मोहिमेस, म्हणुनी येतों वरी मङ्गले !
कोमेजू बघ लागलीं वनफुलें, सूर्या जरा थाम्ब ना !
होतां भेट न आणि सान्ज टळतां ?–छे ! ती नको कल्पना !

ता० १ मार्च १९२३

# मावळ-गीत

वृत्तः—वियद्गङ्गा चतुर्गणी

भवानी आमुची आई, शिवाजी आमुचा राणा,
मराठी आमुची बोली, गनीमी आमुचा बाणा. १
मराठयांच्या प्रदेशाचा कणा हा सह्यबन्धारा,
न कोठें पारतन्त्र्याला दऱ्या-खोऱ्यांत या थारा. २
अडाणी मावळे काळे शिपाई हे शिवाजीचे,
उभे हे खाम्ब पोलादी मराठी सर्फराजीचे. ३
अशांचा म्होरप्या सर्जा, ह्मणो त्याला कुणी चुव्वा,
करी आदीलशाहीचा प्रतापें आपुल्या धुव्वा. ४
निघाला काळ अफ्जल्खां धराया कोंवळ्या पोरा,
न चाले राक्षसाचा त्या भवानीच्या पुढें तोरा ? ५
सदा स्वातन्त्र्यलक्ष्मीची भवानीची कृपा तेथें
पडावी पेटल्या होमीं सदा स्वार्थाहुती जेथें. ६
भवानीलाच सर्ज्यानें दिला दाणीस तो म्हैसा,
प्रतापाचा जणू भानू शिवाजी भोंसला ऐसा ! ७
गडींचीं वाजतां भाण्डीं, उठे झाडी, पडे हल्ला—
चमू आदीलशाहीची अखेरीला म्हणे, "अल्ला !" ८
हुडा हा पूर्वबाजूचा सदा देईल ही ग्वाही,
प्रतापी हिन्दुशाहीची इथूनी गाजली द्वाही. ९
जहाली आमुची फत्ते, खुशाली या करा, गर्जाः—
भवानी आमुची आई, शिवाजी आमुचा सर्जा. १०

ता० ३० एप्रील १९२३ इसवी

सर्फराजीचे=उन्नतीचे. सर्जा=सिंव्ह. दाणी=बळी. भाण्डीं=तोफा. हुडा=बुरूज. खुशाली=आनन्दीआनन्द.

# सहधर्मिणीस

वृत्तः—मधुवाहिनी चतुर्गणी

सहधर्मिणी, तुजवांचुनी दुनिया सुनी मज वाटते,
फिरतों प्रसन्न उन्हांत या तरि अन्तरीं तम दाटतें. १
हंसतों जनांत वरीवरी करुनी रसाळ विनोद मी,
परि एकला पडतां घरीं हुरहूर गूढ करी श्रमी. २
जन हो जिथें सुखमग्नपी रसरङ्गमङ्गल उत्सवीं
बघुनी सुखी तिथ जोडपीं हरपे मदीय मुखच्छवी. ३
भरयौवनींच म्हणून मी भटके वनीं हृदयप्रभे,
परि हाय राहुन राहुनी सय हो तुझी मज दुर्लभे. ४
बहरून रान-गुलाब हे, झुबके हवेमधिं डोलती,
वरुनीच रङ्गुन एकही नच बोल गन्धित बोलती. ५
कुसरीस वैभव शुभ्र ये, जमल्या जणू वनतारका !
गजरा करूं तर कोमती–मळलाच घेशिल हार का ? ६
डुबरें सड्यावर रान हें जणु दाट लोंकर पाचवी,
मधिं लम्बवर्तुळ हें तळें, लहरींस मारुत नाचवी. ७
ढग कापशी तरतीं नभीं, चढतीं दरींतुन ते वरी;
—चढवे मला न तुझ्याविना, सहधर्मिणी ! कर दे करीं. ८
न जनीं वनीं कमनीयता, कमनीय तूं, तुजवांचुनी
मज आपुला म्हण कीं अतां तुजवांचुनी दुनिया सुनी. ९

ता० १९ जून १९२३

डुबरें=खुजें. सडा=पठार. पाचवी=पाचूची.

# अगोट

—०—

( गज्जल )

अगोट लागुन ही तर्र जाहली धरणी,
जणू कुणी हिरवा शालु नेसली सजणी. १
नदी कषायित फोंफावुनी फुगे दुथडी,
अधीर वल्लभभेटीस हो नवी तरणी. २
पडून झिमझिम पाऊस धुन्दतात दिशा,
मलाहि होय कसेंसेंच लागुनी झुरणी. ३
हलूं नयेच इथूनी गमे, भिजे तनु ही—
करून धीर रिघावें कुणाचिया शरणीं ? ४
कितीक सांठवणी पूर्व सूखदुक्खाच्या !
खुल्या करून कथाव्या कुणास आठवणी ? ५
असा निमग्न विचारांत कातळावर मी,
पुढून आलिस तों तूं चढून या चढणी. ६
चपापलों तुज देखोन, लाजलोंहि जरा;
—पुढें मनीं भय—एकान्त आणि तूं रमणी ! ७
विभागवी स्मित आरक्त ओंठ हे चिमणे;
लघाळ दृष्टि करी हाय जादुची करणी ! ८
कुठें भणङ्ग खुळा मी, कुठें रमा ललिता !
अमोल कौस्तुभ तूं, मी भिकार काचमणी. ९

रमे वसन्त फुलारी तुझ्या तजेल मुखीं,
पहा तुला सजवी तो नवीन आभरणीं १०
विशाळ निर्मळ इन्दीवरें तुझ्या नयनीं
गुलाब गालिं फुलूनी बहार भैतरणी ! ११
सुरेख उन्नत सङ्गीन गुच्छ हे असुनी
न नम्रता, न गती मन्द ये तुझ्या चरणीं. १२
तनूंत राजस तारुण्य मुसमुसून निघे
परन्तु तूं हरिणी जी उडे खुल्या कुरणीं. १३
बघून हास्य तुझें दङ्ग गुङ्ग मी चपले,
श्रवून मञ्जुळ पुङ्गी जसा रसज्ञ फणी. १४
मुळींच हेतु कळेना तुझा, कळेल कसा ?
कशास लाविशि माया जिवास या गडणी ? १५
स्मितांत निर्मळ तूझ्या सदा बुडूं मज दे,
तरून जाइन वेगें भवाब्धि–वैतरणी. १६
तुझ्या स्मितांत मला स्वर्ग भूवरी दिसतो,
परी अशा कुणग्याचा कळे न कोण धणी ? १७
तुझ्या स्मितास कसें आज देउं उत्तर मी ?
पटेल काय तुला तें पडूनही श्रवणीं ? १८
असाच लोभ असूं दे; कधींतरी पुढती
कथीन हृद्गत माझें करीत आळवणी. १९

ता० २८ जुलै १९२३

अगोट=पावसाळ्याची सुरुवात.

# निर्माल्य-समर्पण

[ सुनीत-वृत्तः—मदालसा ]

स्फूर्ती दिली तूं, गाइलीं मी फार पूर्वीं गायनें,
पायीं तुझ्या मी वाहिलीं तीं प्रेमगीतोपायनें;
पिवळी जुनी कवितावही ती वाचितां वाटे अतां
सायन्तनीं स्मरतां उषा वाटे जसें हसिताननें.
दृष्टींतुनी चुकती न हे जरि साम्प्रदायिक मायने,
गवसे अकल्पित अर्थही, नव सूक्ष्मभावरसायनें,
माझीच मात्र न हो मला जाणीव राजस मानिनी,
कवनांत माझ्या ऐकतों तव मागलीं मधु भाषणें.
माझ्या तुझ्यामधिं सांचलें कित्येक वर्षांचें धुकें
विसरून गेलों गान तें कीं जाहलों दोघे मुके;
ती तीव्रता, लोलङ्गता गेली, अहन्ता लोपली;
भक्तीच केवळ राहिली, न तिचा जिवन्त झरा सुके.
बदलून मन्त्र जुना पुन्हा निर्माल्य हा तुज वाहिला—
दिन सम्पला, असिताम्बरीं ध्रुव मात्र तेवत राहिला.

ता. ६ मार्च १९२४.

मराठी ग्रंथ संग्रहालय
२४५४

REFBK-0002844
REFBK-0002844